आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१२ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आज प्रधानमंत्र्यांसह अनेक बड्या नेत्यांच्या ठिकठिकाणी सभा
- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उद्या मतदान
- चालू आर्थिक वर्षात आत्तापर्यंत देशाच्या एकूण प्रत्यक्ष कर संकलनात १५ पूर्णांक ४१ शतांश टक्क्याची वाढ

  **आणि**

- सार्वजनिक प्रसारण दिनानिमित्त आज विशेष कार्यक्रम

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच पक्षांचे ज्येष्ठ नेते झंझावाती दौरे करुन आपापल्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांना मत देण्याचं आवाहन मतदारांना करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इतर ज्येष्ठ नेते राज्यातल्या विविध जिल्ह्यांमध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज दुपारी चिमूर येथे, त्यानंतर सोलापूर आणि संध्याकाळी पुण्यात प्रचारसभा घेतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आज मुंबईत दोन सभा होणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची लातूर जिल्ह्यात देवणी इथं सभा झाली. त्या परिसरातल्या रस्ते आणि दळणवळण विषयक कामांची माहिती त्यांनी आपल्या भाषणात दिली.

यानंतर ते बीड, जालना आणि नागपूर येथे प्रचार करणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते योगी आदित्यनाथ अकोला, अमरावती आणि नागपूर इथे सभा घेणार आहेत. भाजपा नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांच्या सभा डहाणू, विक्रमगड, पेण, शीव-कोळीवाडा आणि कल्याण इथं होणार आहेत.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीसाठी मविआ उमेदवाराच्या प्रचारार्थ ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नाशिकच्या कळवण इथे सभा घेतली. भाजपाला संविधानात बदल करायचा असल्याची टीका पवार यांनी यावेळी केली. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी प्रधानमंत्री चारशे जागांवर निवडून देण्याविषयी प्रचार करत होते. वास्तविक नियोजित संख्याबळ नसतानाही देशात सरकारं टिकली आहेत. पण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाचा कारभार चालावा यासाठी जी राज्यघटना लिहिली त्यात कुणाला बदल करायचा असेल तर त्याला अधिक खासदारांची गरज आहे. त्यामुळेच ४०० पेक्षा जास्त खासदार निवडून देण्याविषयी मोदी प्रचार करत होते, असं शरद पवार या भाषणावेळी म्हणाले.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांची बुलडाणा जिल्ह्यातल्या चिखली मतदारसंघातली आजची नियोजित सभा रद्द झाली आहे. विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे आपण चिखलीला येऊ शकलो नाही, असं राहुल गांधी यांनी समाज माध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीन आणि कापसाला हमीभाव मिळत नाही, त्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. मात्र राज्यात इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर सर्व समस्यांचं निराकरण केलं जाईल, असं आश्वासन गांधी यांनी या संदेशात दिलं आहे.

महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी आज नाशिक जिल्ह्यात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पाच प्रचारसभा होणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचीही आज सोलापूर इथं सभा आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे माहीममध्ये सभा घेणार आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे आज वरळीत प्रचार करणार आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध अंमलबजावणी संस्थांच्या कारवाईत १५ ऑक्टोबरपासून आतापर्यंत ४९३ कोटी ४६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे. तर सी व्हिजिल ऍपवर आतापर्यंत आचारसंहिता भंगाच्या ४ हजार ७११ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४ हजार ६८३ तक्रारी निवडणूक आयोगाने निकाली काढल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे.

मुंबईत नेरूळमध्ये एका घरातून २  कोटी ६० लाखां रुपयांची रोख रक्कम नवी मुंबई पोलिसांनी जप्त केली. कोल्हापूर विधानसभा मतदार संघात आतापर्यंत १० कोटी ७१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज पुणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी न चुकता आपला मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन अभिनेता संतोष जुवेकर यांनी केलं आहे…

**होल्ड.. बाईट….संतोष जुवेकर (१४ सेकंद)**

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उद्या मतदान  होत आहे. या टप्प्यात ४३ मतदारसंघात मतदान होणार असून त्यासाठीची तयारी पूर्ण झाली आहे. २२५ संवेदनशील मतदारसंघ आहेत तर एकूण १५ हजार ३४४ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. सुरक्षा दलाच्या दोनशेहून अधिक तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. सकाळी सात ते संध्याकाळी ५ या कालावधीत मतदान होईल.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या प्रचारासाठी धनबाद इथं सभा घेतली.

**<><><><><>**

देशातल्या इतर राज्यातल्या विधानसभा पोटनिवडणुकीसाठीच्या पाच, बिहारमधे विधानसभेच्या चार जागांसाठी तर केरळात लोकसभा आणि विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी उद्या होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठीची तयारी पूर्ण झाली आहे.

**आसाम**मधे ३४ उमेदवार रिंगणात असून ९ लाखाहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

**बिहार**मधे इमामगंज, बेलागंज, तरारी आणि रामगड या मतदारसंघात उद्या पोटनिवडणूक होणार आहे. त्यासाठी ३८ उमेदवार आपलं भविष्य आजमावणार असून १२ लाखाहून अधिक मतदार मतदान करणार आहेत. केंद्रीय मंत्री जितन राम मांझा, राजद प्रदेशाध्यक्ष जगदानंद सिंग, राजदचे माजी मंत्री सुरेंद्र प्रसाद यादव हे दिग्गज निवडणुकीच्या रिंगणात आहेत. **केरळा**त वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी तसंच छेलक्करा राखीव विधानसभा मतदारसंघासाठी उद्या पोटनिवडणूक होत  आहे. त्यासाठी प्रशासन सज्ज झालं आहे. वायनाडमधे युनायटेड डेमॉक्रॅटिक फ्रंटच्या तिकिटावर काँग्रेसच्या प्रियंका गांधी पहिल्यांदाच निवडणूक लढवत असल्यामुळे या निवडणुकीकडे विशेष लक्ष आहे. त्यांच्या विरोधात एलडीएफचे सत्यन मोकेरी आणि भाजपाच्या नव्व्या हरिदास निवडणूक लढवत आहेत. एकूण १६ उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात आत्तापर्यंत देशाच्या एकूण प्रत्यक्ष कर संकलनात १५ पूर्णांक ४१ शतांश टक्क्याची वाढ झाली आहे. हे संकलन १२ लाख १० हजार कोटी रुपयांहून अधिक झाल्याची माहिती सीबीडीटी अर्थात केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं दिली आहे.  कॉर्पोरेट कर संकलनातही किरकोळ वाढ झाली आहे.  गेल्या वर्षी एक एप्रिल ते १० नोव्हेंबर या कालावधीत झालेल्या कॉर्पोरेट कर संकलनात चार लाख ७९ हजार कोटी रुपयांची वाढ होऊन हे संकलन यंदाच्या वर्षात आत्तापर्यंत पाच लाख १० हजार कोटी रुपये इतकं झाल्याचं सीबीडीटीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

सुरक्षा व्यवस्थेला उद्भवणारा धोका आणि युद्धाच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी लवचिक संरक्षण धोरण महत्वाचं असल्याचं संरक्षण राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं दिल्ली संरक्षण संवादात बोलत होते. लवचिक संरक्षण धोरण ही केवळ धोरणात्मक निवड नाही तर आत्यंतिक गरज आहे, असंही ते म्हणाले. भविष्यातल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी हे धोरण लवचिकता, नाविन्य यावर आधारित असणं गरजेचं आहे, असंही राजनाथ सिंह यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू आजपासून केंद्र शासित प्रदेश दादरा आणि नगर हवेली तसंच दमण आणि दीवच्या तीन दिवसीय दौऱ्यावर आहेत. राष्ट्रपती आज जम्पोर इथं शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट देणार आहेत. तर, उद्या त्या सिलवासा इथल्या नमो मेडिकल एजुकेशन एंड रिसर्च इंस्टीट्यूटला भेट देणार आहेत.

**<><><><><>**

सार्वजनिक प्रसारण दिन आज साजरा होत आहे. फाळणीच्या वेळी हरियाणात कुरुक्षेत्र इथं आसरा घेतलेल्या निर्वासितांना आधार देणारं भाषण राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी १२ नोव्हेंबर १९४७ रोजी आकाशवाणी दिल्लीच्या स्टुडियोमधून केलं होतं. त्या स्मृतीप्रित्यर्थ हा दिवस साजरा होतो. आकाशवाणी दिल्लीच्या सभागृहात आज या निमित्त विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन दुपारी ३ वाजल्यापासून होणार आहे. त्यामुळे आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरुन दुपारी ३

वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज दुपारी २ वाजून ५० मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

प्रबोधिनी एकादशी म्हणजेच कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर इथल्या मंदिरात श्री विठ्ठल रखुमाईची शासकीय पूजा पुण्याचे विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते आज पहाटे करण्यात आली. लातूर जिल्ह्यातल्या उदगीरचे बाबूराव सगर आणि त्यांच्या पत्नी सागरबाई यांना महापूजेचा मान मिळाला. सगर दाम्पत्य गेली १४ वर्ष पंढरीची वारी करत आहे. कार्तिकी एकादशी निमित्त पंढरपूरमध्ये तीन लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत.

**<><><><><>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतराष्ट्रीय विमानतळावर अवैधरीत्या सोनं आणणाऱ्या प्रवाशाला सीमाशुल्क विभागानं काल अटक केली. दुबईतून आलेल्या या प्रवाशाकडून ३ सोन्याची बिस्किटं जप्त करण्यात आली. तीन किलोग्रॅम वजनाच्या या सोन्याची किंमत दोन कोटी २७ लाख इतकी आहे. कपड्यांच्या खिशात लपवून त्यानं हे सोनं आणलं होतं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे नव्यानं झालेल्या हिमवृष्टीनंतर, दक्षिण काश्मीरला राजौरी आणि पूँछ भागाला जोडणारा मुघल मार्ग आणि बांदिपोरा- गुरेझ मार्ग वाहतुकीसाठी तात्पुरता बंद करण्यात आला आहे. सोनमर्गमधे झालेल्या हिमवृष्टीमुळे काल सोनमर्ग- कारगील राष्ट्रीय महामार्गही बंद केल्याची माहिती वाहतूक विभागाच्या

अधिकाऱ्यानं दिली. हवामानात सुधारणा झाल्यावर बंद रस्त्यांवर साठलेला बर्फ काढला जाईल, असंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.  श्रीनगर- जम्मू राष्ट्रीय महामार्गावरची वाहतूक मात्र सुरू आहे.

तामिळनाडूत चेन्नई, तिरूवल्लूर, कांचिपूरम आणि चेंगलपेट इथं आणखी काही दिवस मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमधे  डेहराडून शहरात काल रात्री उशिरा झालेल्या भीषण कार अपघातात ६जणांचा मृत्यू झाला. तर एका प्रवाशाची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भरधाव कंटेनरने इनोव्हा कारला धडक दिल्यामुळे हा अपघात झाला, असं पोलिसांनी सांगितलं.